# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,
# परभणी

---

विद्यापीठांतर्गत सर्व कार्यालया मधील अधिकारी /कर्मचारी यांनी गोपनियतीची धोरणात्मक माहिती संबधी गोपनियता ठेवणेबाबत..

## परिपत्रक

क्रमांक २०२१/प्र.क्र.-४० /परिपत्रक/आस्था-८ 12537

दिनांक : १६/०७/२०२१

विद्यापीठांतर्गत सर्व कार्यालयातील / विभागातील कार्यरत अधिकारी / कर्मचारी /नियंत्रण अधिकारी यांनी कार्यालयातंर्गत/विभागातंर्गत महत्वाच्या विषयासंबधी गोपनियता ठेवणे आवश्यक आहे. परंतू अलीकडे महत्वाच्या गोपनिय प्रकरणाच्या संबधीत माहिती जनमानसात/ वृत्तपत्रात/ प्रसार माध्यामाकडे जात असल्याचे दिसून येत आहे. विद्यापीठांतर्गत असलेल्या कार्यालयातील अधिकारी /कर्मचारी / नियंत्रण अधिकारी यांनी त्यांची कर्तव्य सदभावपुर्वक पार पाडणे अपेक्षीत असून इतर व्यक्तीस अनधिकृत फायदयासाठी माहिती पुरविणे / सांगणे हे विद्यापीठाच्या हितार्थ योग्य नसून गोपनियतेचा व प्रशासकीय नियमाचा भंग कराणारी आहे.

सबब, या परिपत्रकाद्वारे सुचित करण्यात येते की, विद्यापीठाच्या धोरणावर प्रतिकूल परिणाम होईल आणि त्यामधून सामान्य जनमानसातून विद्यापीठाबदद्ल गैरसमज निर्माण होइल अशी कोणतीही माहिती / सेवा विषयक / प्रशासकीय दृष्टया गोपनिय माहिती विद्यापीठातील अधिकारी /कर्मचारी नियंत्रण अधिकारी यांनी बाहेरील व्यक्तीशी /प्रसार माध्यमांसी माहिती पुरविणे/ चर्चा करणे किंवा त्यांचेशी संवाद साधणे जिच्या मुळे गोपनिय माहिती उघड होइल अशी कोणतीही माहिती उघड करणे /कृती करणे टाळावे.

याउपरही विद्यापीठातील अधिकारी /कर्मचारी यांच्या कडून कार्यालयातील गोनियतेची माहिती बाहेर जात असल्याची बाब निदर्शनास आली आणि जी माहिती उघड करण्यामूळे विद्यापीठाच्या हिताला बाधा पोहचली असे मत नियुक्ती प्राधिकारी यांचे झाल्यास अशा संशयास्पद सचोटी अधिकाऱ्यांचा /कर्मचाऱ्यांचा शोध घेवून त्याचे विरुध्द म.ना.से (वर्तणूक ) नियम १९७९ च्या नियम ८,९,१० चा भंग केला आहे असे मानून नियमा नुसार शिस्तभंगाची कार्यवाही सुरु करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

**मा.कुलगुरु यांचे मान्यतेने,**

(धिरजकुमार प्र.कदम)
**कुलसचिव**

**प्रतिलिपी :**

खालील अधिकारी यांनी त्यांच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालय प्रमुखांना देवून सदर परिपत्रक सर्व अधिकारी /कर्मचारी यांचे निदर्शनास आणून द्यावे.

१. संचालक शिक्षण (कृषि) /संचालक संशोधन/संचालक विस्तार शिक्षण, वनामकृवि, परभणी.
२. सहयोगी अधिष्ठाता (शिक्षण), वनामकृवि, परभणी.
३. विद्यापीठ अभियंता / नियंत्रक, वनामकृवि, परभणी.
४. उप-कुलसचिव (आस्था/साप्रवि/विद्या), वनामकृवि, परभणी.

**प्रत :**

१. मा. कुलगुरु यांचे खाजगी सचिव, वनामकृवि, परभणी.
२. प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद,वनामकृवि, परभणी यांना माहीस्तव देऊन कळविण्यात येते की, सदर पपिरपत्रक संकेतस्थळावर प्रसारीत करावे.